RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार-ब

वर्ष १२, अंक ३५ (५)] गुरुवार, मार्च १२, २०२६/फाल्गुन २१, शके १९४७ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक १०७

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

जलसंपदा विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १२ मार्च, २०२६.

अधिसूचना

नियंत्रक व महालेखापरीक्षक (कर्तव्य, अधिकार व सेवेच्या शर्ती) अधिनियम,१९७१.

क्रमांक अधिसूचना-२०२५/(प्र.क्र.२१/२५)/लेप.— ज्याअर्थी, सार्वजनिक हितासाठी महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, कायदा, २००५ (सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८) च्या कलम ३ च्या पोट कलम (१) अन्वये प्रस्थापित "महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई" (यात यापुढे ज्याचा “उक्त महामंडळ” असा निर्देश करण्यात आला आहे) यांच्या लेख्यांची लेखापरीक्षा भारताचे नियंत्रक महालेखापरीक्षक यांच्याकडून होणे आवश्यक आहे. याबाबत महाराष्ट्राचे राज्यपाल यांची खात्री झाली आहे.

त्याअर्थी, आता नियंत्रक व महालेखापरीक्षक (कर्तव्ये, अधिकार व सेवेच्या शर्ती) अधिनियम, १९७१ (१९७१ चा ५६) यांच्या कलम २० च्या पोट-कलम (१) व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्राचे राज्यपाल, नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्याशी विचारविनिमय केल्यानंतर आणि उक्त प्राधिकरण अशा लेखापरीक्षेच्या प्रस्तावांसंबंधात अभिवेदन देण्याची संधी दिल्यानंतर, याव्दारे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांना यासोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या अटींवर व शर्तींवर पाच वर्षाच्या कालावधीसाठी महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई यांचे दिनांक १ एप्रिल २०२५ पासून ३१ मार्च २०३० पर्यंत प्राधिकरणाच्या लेख्यांची लेखापरीक्षा करण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे.

अनुसूची

नियंत्रक व महालेखापरीक्षक (कर्तव्य, अधिकार व सेवेच्या शर्ती) अधिनियम, १९७१ याच्या कलम २० च्या पोट-कलम (१) अन्वये नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्याकडे लेखापरीक्षा सोपविण्याबाबतच्या प्रमाण अटी व शर्ती.

अटी व शर्ती

(१) नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी स्वतःच्या वतीने आणि स्वतः दिलेल्या अनुदेशांनुसार / मार्गदर्शक तत्त्वांनुसार लेखापरीक्षा करण्यासाठी एखाद्या प्राथमिक लेखापरीक्षकाची नियुक्ती सुचवावी. असा एखादा लेखापरीक्षक नियुक्त करण्यात आला असेल त्याबाबतीत, त्या लेखापरीक्षकाला द्यावयाचे शुल्क महामंडळाकडून देय असेल. असा लेखापरीक्षक नियुक्त करण्यात आला नसेल त्याबाबतीत, लेखापरीक्षेच्या संबंधात भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्याकडून करण्यात आलेल्या खर्चाची रक्कम उक्त महामंडळाकडून त्यांना देय होईल.

(२) नियंत्रक व महालेखापरीक्षक यांना असा प्राथमिक लेखापरीक्षक नियुक्त करण्यात आला असेल तर त्याच्याकडून करावयाच्या लेखापरीक्षेबरोबरच लेख्यांची चाचणीदेखील तपासणी करण्याचा आणि प्राथमिक लेखापरीक्षकाच्या अहवालावर अभिप्राय देण्याचा अधिकार असेल.

(३) भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक किंवा लेखापरीक्षेच्या संबंधात त्यांनी नियुक्त केलेली कोणतीही व्यक्ती यांना नियंत्रक व महालेखापरीक्षक यांस शासनाच्या लेख्यांची लेखापरीक्षा करण्यासंबंधात जे अधिकार, विशेषाधिकार व प्राधिकार असतात तेच अधिकार, विशेषाधिकार व प्राधिकार सदर व्यक्तीस असतील.

(४) नियंत्रक व महालेखापरीक्षक किंवा त्यांनी नियुक्त केलेली एखादी व्यक्ती लेखापरीक्षेचा अहवाल नियामक मंडळाला कळवील. नियामक मंडळ त्यांच्या म्हणण्यासह अहवालाची प्रत शासनास सादर करील. नियंत्रक व महालेखापरीक्षकही अहवालाची प्रत थेट शासनाकडे पाठवतील.

(५) त्या कालावधीनंतर त्या व्यवस्थेचे पुनर्विलोकन करण्याच्या अधीन राहून लोकहिताच्या दृष्टीने नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्याकडे सोपविलेली लेखापरीक्षा दिनांक १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०३० पर्यंतच्या पाच वर्षाच्या लेख्यांच्या कालावधीसाठी असेल.

(६) लेखा परिक्षेची व्याप्ती, मर्यादा व ती करण्याची पद्धत नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी ठरविल्याप्रमाणे असेल.

(७) अशा तऱ्हेने केलेल्या लेखा परीक्षणाचा अहवाल राज्य विधानमंडळात सादर करणे, ही बाब भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या स्वेच्छानिर्णयावर अवलंबून राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

दिपक कपूर,
शासनाचे अपर मुख्य सचिव.

प्रत :-

(१) मा. राज्यपालांचे सचिव.

(२) मा. मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

(३) सचिव (लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

(४) सचिव, महाराष्ट्र जलसंपती नियमन प्राधिकरण, मुंबई.

(५) सर्व मुख्य अभियंता व सह सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

(६) अप्पर मुख्य सचिव, (जलसंपदा), जलसंपदा विभाग, यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

(७) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

(८) विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

(९) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

(१०) व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई (पत्राने).

(११) मा. मंत्री (जलसंपदा), कृष्णा व गोदावरी खोरे महामंडळ, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

(१२) मा. मंत्री (जलसंपदा), (विदर्भ, तापी व कोकण महामंडळ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

(१३) लेखा परीक्षा संग्रहार्थ.

WATER RESOURCES DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, Dated the12th March, 2026.

NOTIFICATION

COMPTROLLER AND AUDITOR GENERAL´S (DUTIES, POWERS AND CONDITIONS OF SERVICE) ACT,1971.

No. ADHISUCHANA 2025/C.R.21/2025/Audit Cell.— Whereas, the Governor of Maharashtra is satisfied that it is necessary, in the public interest, to audit the accounts of the Maharashtra Water Resources Regulatory Authority, Mumbai consituted under sub - section (*1*) of section 3 of the Maharashtra Water Resources Regulatory Authority Act, 2005 (Mah. XVIII of 2005) (hereinafter referred to as "the said Authority ") by the Comptroller and Auditor -General of India;

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-section (*1*) of section 20 of the Comptroller and Auditor-General's (Duties, Powers and Conditions of Service) Act, 1971 (56 of 1971), the Governor of Maharashtra, after consultation with the Comptroller and Auditor-General of India and giving the said Authority an opportunity to make representation with regard to the proposal for such audit, hereby requests the Comptroller and Auditor-General, to audit the accounts of the said Authority, for a period of five years commencing from the 1st April 2025 and ending on the 31st March 2030, on the terms and conditions mentioned in the Schedule appended hereto.

SCHEDULE

(Terms and conditions for entrustment of audit to the Comptroller and Auditor-General of India under sub-section (*1*) of section 20 of the Comptroller and Auditor General´s (Duties, Powers and Conditions of Service) Act, 1971.)

Terms and Conditions

(1) The Comptroller and Auditor-General of India may, suggest the appointment of a primary auditor to conduct the audit on his behalf and on the basis of directions or guidelines issued by him. In such a case the fees to such auditor will be payable by the said Authority and where such an auditor is not appointed, expenditure incurred by Comptroller and Auditor-General of India, in connection with the audit will be payable to him by the said Authority.

(2) In addition to audit to be conducted by the primary auditor, where so appointed, the Comptroller and Auditor-General of India will have the right to conduct such test check of the accounts and to comment on the supplement report of the primary auditor, as he may deem fit.

(3) The Comptroller and Auditor-General of India or any person appointed by him in connection with such audit, shall have the same rights, privileges and authority as the Comptroller and Auditor-General has in connection with the audit of the Government accounts.

(4) The report of audit will be communicated by the Comptroller and Auditor-General or any person appointed by him to the Governing body of the said Authority and the governing body of the said Authority shall submit a copy of the report along with its observation to the Government. The Comptroller and Auditor-General shall also forward a copy of the report directly to the Government.

(5) The audit entrusted to the Comptroller and Auditor-General in public interest shall be for a period of five years commencing with accounts for the year 1st April 2025 and ending with the accounts for the year 31st March 2030 subject to review of arrangement after that period.

(6) The scope, extent and manner of conducting audit shall be as decided by the Comptroller and Auditor-General.

(7) The Comptroller and Auditor-General will have the right to report to the State Legislature, the audit report at his discretion.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

DEEPAK KAPOOR,
Additional Chief Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.

Copy to:-

(1) The Secretary to Hon`ble Governor.

(2) The Secretary to Hon`ble Chief Minister-400 032.

(3) The Secretary (CADA) Water Resources Department, Mantralaya, Mumbai 400 032.

(4) The Secretary, Maharashtra Water Resources Regulatory Authority, Mumbai, 400 032.

(5) All Chief Engineer and Joint Secretaries, Water Resources Department, Mantralaya, Mumbai 400 032.

(6) P. A. Additional Chief Secretary (WR), Water Resources Department, Mantralaya, Mumbai 400 032.-

(7) The General Administration Department, Mantralaya, Mumbai 400032.

(8) The Law and Judiciary Department, Mantralaya, Mumbai 400032.

(9) The Finance Department, Mantralaya, Mumbai 400 032.

(10) The Manager, Government Printing Press, Mumbai. (by letter)

(11) P. S. To Minister, Water Resources, (Krishna & Godavari IDC), Mantralaya, Mumbai 400 032.

(12) P. S. To Minister, Water Resources, (Vidarbha, Tapi & Kokan IDC), Mantralaya, Mumbai 400 032.

(13) Audit cell Collection / select File.